Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक १] गुरुवार ते बुधवार, जानेवारी ७-१३, २०२१/पौष १७-२३, शके १९४२ [पृष्ठे ७, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १–७ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | नाही. |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक प्र.अ.-भूसं.-अ.का.-कावि-१८०-२०२०.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना क्रमांक ८४२/१९, दिनांक २३ डिसेंबर २०१९ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढलेली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार

वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, अमरावती जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर वर्धा प्रकल्प, लाभक्षेत्र क्र. २, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ४-४७-२०१८-१९, गाव सोनगांव, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती

| अनुक्रमांक | सर्व्हे नंबर/गट नंबर | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | २५९ पै. | ० ४० |
| | एकूण क्षेत्र . . | ० ४० |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव.—सोनगांव-शिवणी बृहत ल. पा. प्रकल्पाचे कामाकरीता.

प्रकल्प कार्याचे वर्णन.—सोनगांव-शिवणी बृहत ल. पा. प्रकल्पाचे कामाकरीता.

सामाजिक मिळणारे लाभ.—सोनगांव-शिवणी बृहत ल. पा. प्रकल्पाचे निर्मितीमुळे जवळपासच्या क्षेत्रात पाणी पातळीत वाढ होऊन सिंचनासाठी, पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धनामध्ये वाढ, कुटीर उद्योगास फायदा व रोजगार निर्मिती इत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणार आहे.

## अनुसूची-तीन

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

विस्थापन होत नसल्याने पुनर्वसाहतीची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

## अनुसूची-चार

## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

सदर प्रकरणी घरे/कुटुंबे बाधीत होत नाहीत. सबब विस्थापन होत नसल्याने पुनर्वसनाची व पुनर्वसाहतीची (पुनर्स्थापनेची) आवश्यकता नाही.

अमरावती :
दिनांक ५ मार्च २०२०.

**शैलेश नवाल,**
जिल्हाधिकारी, अमरावती.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उपजि-भूसं.रप्र-कलि-कावि-७९०-२०२०.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना क्रमांक -प्र.अ.-भूसं.रप्र-कलि-कावि-९९-२०२०, दिनांक १३ फेब्रुवारी २०२० अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढलेली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची गरज भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रस्ते प्रकल्प, यवतमाळ, जि. यवतमाळ यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ३२-४७-२०१७-१८, गाव कामठवाडा, ता. कळंब, जि. यवतमाळ

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ५९/१ | १ १२ |
| २ | ५९/२ | १ ८६ |
| ३ | ५९/३ | ० ८९ |
| ४ | ६० | ० ४२ |
| ५ | ६१ | ० १२ |
| ६ | ६२/१ | ० ८१ |
| ७ | ६२/१/अ | ० ८० |
| ८ | ६२/२ | १ १३ |

**अनुसूची-एक-**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | | हे. आर |
| ९ | ६५/१ | ० ४६ |
| १० | ६५/२ | ० ४८ |
| ११ | ६५/३ | ० ४६ |
| १२ | ६५/४ | ० ४३ |
| १३ | ६५/५ | ० ४९ |
| १४ | ६५/६ | ० ५५ |
| १५ | ६५/७ | ० ६३ |
| १६ | ६५/८पै | २ १५ |
| १७ | ९६ | २ ६० |
| १८ | ९७ | ० ५३ |
| १९ | ९८ | ० ५१ |
| २० | ९९ | १ ०४ |
| २१ | १०० | १ ०७ |
| २२ | १०१ | ० ११ |
| २३ | ११६ | ० ४० |
| २४ | ११५ | ० ९७ |
| २५ | ११४ | ० ४१ |
| २६ | ११३/१ | ० १६ |
| २७ | ११३/२ | ० २३ |
| २८ | ११३/३ | १ ०६ |
| २९ | ११७ | ० १५ |
| | एकूण क्षेत्र . . | २२ ०४ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांव.—वर्धा-नांदेड मार्गे यवतमाळ-पुसद नवीन रेल्वे लाईनकरीता.

प्रकल्प कार्याचे वर्णन.—वर्धा-नांदेड मार्गे यवतमाळ-पुसद नवीन रेल्वे लाईनचे सार्वजनिक कामाचे प्रयोजनार्थ.

समाजाला मिळणारे लाभ.—-सार्वजनिक हितार्थ.

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब निरंक

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

— निरंक —

**टीप.—**उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रस्ते प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**एम. देवेंदर सिंह,**

यवतमाळ : जिल्हाधिकारी,

दिनांक २३ नोव्हेंबर २०२०. यवतमाळ.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३.

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) तथा सदस्य सचिव, यांजकडून**

**वाचा.—**(१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-०३-२०१५-प्र.क्र.३४-अ-२, दिनांक १२-०५-२०१५.

(२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-०३-२०१५-प्र.क्र.३४-अ-२, दिनांक ३०-०९-२०१५.

(३) म. शा. महसूल व वन विभाग यांचे परिपत्रक क्र. एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र.१२-भाग-अ-२-मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २५-०१-२०१७.

**खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेणेबाबत**

क्रमांक म.अ.-विभूसंअ.(अवप्र)क्र.२-कावि-२०२६-२०२०.—

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांनी करजगांव लघु प्रकल्पाचे वळण रस्त्याच्या कामाकरीता या सार्वजनिक प्रयोजनाकरिता शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. ०३-२०१५-प्र.अ.३४-अ-२, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत त्यांचे पत्र क्र. जा. क्र. ५०६२-अमप्रवि-रेशा-करजगांव-२०१७, दिनांक ०२ डिसेंबर २०१९ नुसार सरळ खरेदी प्रस्ताव ४-४७-२०१९-२०, मौजा सोमठाणा, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती एकूण क्षेत्रफळ (० हे. ८६ आर) संयुक्त मोजणीनुसार ०.८१ हेक्टर आर चा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश पत्र क्र. अ.का.-प्र.अ.-भूसंपादन-कावि-८३१-१९ प्राप्त दिनांक २३ डिसेंबर २०१९ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि त्या अनुषंगाने शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र.१२-अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, आता (१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर वर्धा प्रकल्प, लाभक्षेत्र क्र. २, अमरावती तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती, अमरावती याद्वारे.—

**अनुसूची (एक)**

खाजगी क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे; आणि

**अनुसूची (दोन)**

करजगांव लघु प्रकल्पाचे वळण रस्त्याच्या कामाकरीता जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने संपादीत करताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूमि संपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील

कलमे २६ ते ३० च्या शेड्युल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

## अनुसूची (तीन)

संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नावे खरेदी करून देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः अंतिमरित्या स्वीकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

(२) संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

(३) संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

(४) सदर रस्त्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या पुनर्वसन आराखड्याची प्रत कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

## अनुसूची (चार)

सरळ खरेदी प्रकरण क्रमांक ४-४७-२०१९-२०, मौजा सोमठाणा, ता. चांदूर बाजार, जिल्हा अमरावती

करजगांव लघु प्रकल्पाचे वळण रस्त्याच्या कामाकरीता समाविष्ट (खरेदी करावयाच्या) खाजगी जमिनीचा तपशील

| अ. क्र. | मौजा | गट/सर्व्हे क्र. | भूधारणा प्रकार | नमुना ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र | खरेदी करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | हे. आर | हे. आर |
| १ | सोमठाणा | ९९ | १ | १ ०१ | ० ०४ |
| २ | सोमठाणा | १०० | १ | १ २१ | ० ०५ |
| ३ | सोमठाणा | १०१ | १ | ० ८१ | ० ०३ |
| ४ | सोमठाणा | १०२ पैकी | १ | १ ६२ | ० १२ |
| ५ | सोमठाणा | १०३ | १ | २ ०४ | ० ०७ |
| ६ | सोमठाणा | १०४ | १ | १ ०१ | ० ०२ |
| ७ | सोमठाणा | १०५ | १ | १ ८२ | ० ०४ |
| ८ | सोमठाणा | १०६ | १ | २ ३८ | ० ०५ |
| ९ | सोमठाणा | १०७ | १ | १ ३६ | ० ०३ |
| १० | सोमठाणा | १०८ | १ | ३ ८१ | ० २० |
| ११ | सोमठाणा | १०९ | १ | ४ ६२ | ० १६ |
| | | | एकूण . . | २१ ६९ | ० ८१ |

**मनोज लोणारकर,**

अमरावती.

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),

दिनांक १५ डिसेंबर २०२०.

अपर वर्धा प्रकल्प, लाभक्षेत्र क्र. २ तथा सदस्य सचिव,

जिल्हास्तरीय समिती, अमरावती.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४.

## उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून

**वाचा.—** या कार्यालयाची जाहीर नोटीस क्र. अका-भू.सं.-कावी-११७-२०२०, दिनांक ३१ जानेवारी २०२०.

**खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत**

**शुध्दीपत्र**

क्रमांक अका-भू.सं.-कावी-८१९-२०२०.—

ज्याअर्थी, जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, अमरावती यांनी साठवण तलाव मासोद ने बाधित होणा-या साठवण तलावाचे कामाकरीता या सार्वजनिक प्रयोजनाकरीता या कार्यालयाची उपरोक्त संदर्भाधीन जाहीर नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक अमरावती विभागीय पुरवणीमध्ये दिनांक मार्च ५-११, २०२० ला पान क्रमांक ११-१२, अनुक्रमांक १७५ वर प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्यात खालीलप्रमाणे दुरूस्ती वाचावी.—

**अनुसूची (एक)**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०३-४७-२०१९-२०, मौजा मासोद, ता. चांदूर बाजार, जिल्हा अमरावती

प्रकल्पाचे आखणीमध्ये समाविष्ट (खरेदी घ्यावयाच्या) जमिनीचा तपशील

**या करीता**

| गट/सर्व्हे क्रमांक | भूधारणा प्रकार | ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र | खरेदी करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | हे. आर | हे. आर |
| ६ | भो. वर्ग-१ | १ ३५ | ० ६४ |
| ६ | भो. वर्ग-१ | १ ४८ | १ ०० |
| २६ | भो. वर्ग-१ | १ ३२ | ० ३२ |
| | एकूण . . | ४ १५ | १ ९६ |

**असे वाचावे**

| गट/सर्व्हे क्रमांक | भूधारणा प्रकार | ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर) + (पो.ख.) | खरेदी करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | हे. आर | हे. आर |
| ६ | भो. वर्ग-१ | १ ६४ | १ ०० |
| ६ | भो. वर्ग-१ | १ ७७ | १ ४५ |
| २६ | भो. वर्ग-१ | १ ३३ | ० ४२ |
| | एकूण . . | ४ १५ | २ ८७ |

अचलपूर :
दिनांक २६ नोव्हेंबर २०२०.

**संदीपकुमार श. अपार,**
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी,
अचलपूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.